# कापुरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७०५ /२०२५ दि. २८/०५/२०२५

**—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—**

**ज्याअर्थी,** कापूरबावडी वाहतुक उपविभागाचे हद्दीत माजिवडा मेट्रो स्टेशन या ठिकाणी उभारण्यात आलेल्या मेट्रो स्टेशनवर दिनांक २८/०५/२०२५ रोजी ते दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पर्यंत रूफ (मेट्रो स्टेशनचे छत) उभारण्यासाठी कॉलम उभे करून, त्यावर जॅक बिम टाकण्यात येणार असुन, जॅक बिम उभारल्यानंतर त्यावर राफ्टर उभारण्यात येणार आहे. सदरचे काम हे ६० टनी मोबाईल क्रेनच्या सहाय्याने करण्यात येणार आहे. त्याकरीता सदरची क्रेन ही मुंबई–नाशिक–घोडबंदर माजिवडा उड्डान पुलावरील मुख्य वाहीनीवर ज्युपीटर चढणी या ठिकाणी उभी करून सदरचे काम करण्यात येणार आहे. त्याकरीता माजिवडा ब्रिजवरून मुंबई कडून नाशिक अथवा घोडबंदरकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक पुर्णपणे बंद करावी लागणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद –** १) मुंबईकडून माजिवडा उड्डाण पुलावरून ज्युपीटर वाय जंक्शन मार्गे घोडबंदरकडे अथवा भिवंडीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **विवियाना मॉल समोरील ब्रिज चढणीचे सुरवातीला दुभाजकाजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही ज्युपीटर हॉस्पीटल समोरील स्लीप रोडने पुढे सरळ जावून कापूरबावडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबईकडून माजिवडा उड्डाण पुलावरून ज्युपीटर वाय जंक्शन मार्गे नाशिककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **विवियाना मॉल समोरील ब्रिज चढणीचे सुरवातीला दुभाजकाजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही ज्युपीटर हॉस्पीटल समोरील स्लीप रोडने पुढे सरळ जावून गोल्डन क्रॉस मार्गे इच्छित स्थळी जातील.

१) दि. २८/०५/२०२५ रोजी रात्रौ २२:०० वा. ते दि. २९/०५/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
२) दि. २९/०५/२०२५ रोजी रात्रौ २२:०० वा. ते दि. ३०/०५/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
३) दि. ३०/०५/२०२५ रोजी रात्रौ २२:०० वा. ते दि. ३१/०५/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
४) दि. ३१/०५/२०२५ रोजी रात्रौ २२:०० वा. ते दि. ०१/०६/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो

सदरची वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner